# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

क्र.मुमाआ/नों.क्र.७०५ /२०२१ /त.क्र.८१ /२०२६/०१

श्री. किरण एस कोठारी
२०१-ए, अंजली बिल्डिंग २ रा माळा,
ऑपेरा हाऊस सिनेमा समोर, मुंबई-४००००७.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इवका) डी/विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त, डी विभाग कार्यालय,
महापालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला, जोबनपुत्र कंपाऊंड,
नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७.

नोडल अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालाय इमारत,
मुंबई - ४०० ००१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कायर्यकारी अभियंता (इवका) डी/विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त, डी विभाग कार्यालय,
महापालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला, जोबनपुत्र कंपाऊंड,
नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०४.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार यांना अपेक्षित असणारी **जोडपत्र अ** मधील माहिती ही उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अभिजीत दिक्षित यांनी अंजली कॉ. हौ.सोसायटीच्या मंजूर बांधकाम आराखड्यावर CS no. ८/१८८२ नमूद असल्याचे सुचित केले. तथापि, तक्रारदार श्री.कोठारी यांनी या आराखड्यावर CS no. २/१६३२ असा उल्लेख आहे तो आराखडा त्यांना हवा असल्याचे सुचित केले. तथापि, तो आराखडा जन माहिती अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नसल्याचे नमूद केले असता तसे अपिलार्थीना लेखी कळविण्याच्या निर्देशासह अपील अर्ज निकाली काढण्यात आला होता. याचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवीत प्रस्तुत तक्रार अर्ज दिनांक १९/०१/२०२१ रोजी दाखल करण्यात आला आहे.

वरील आदेशाची अंमलबजावणी करणे ज्यांच्याकडून अपेक्षित होते ते जन माहिती अधिकारी श्री.गिते हे प्रस्तुत तक्रार अर्ज प्रलंबित असतानाच्या कालावधीत सेवानिवृत्त झाले असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता

तसेच या संबंधात उपरोक्त माहिती कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नसल्याची वस्तूस्थिती लक्षात घेता तसेच तक्रारदार या आधीही झालेल्या सुनावणीस अनुपस्थित असल्याची वस्तूस्थिती लक्षात घेता प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार क्र.८१/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई** **( राहुल भा. पांडे )**
**दिनांक : ०७.०४.२०२६** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**